...पुनर्वसन प्राधिकरण
... इमारत, अनंत काणेकर मार्ग,
... (पूर्व) मुंबई - ४०० ०५१
Email: info@sra.gov.in

क्र. झोपुप्रा/उजि/कार्या-२/टे/डी-२/परिपत्रक/भुसंपादन/२०१०/2621
दिनांक :- 06 OCT 2010

परिपत्रक :- ११८

विषय :-झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबत.
महाराष्ट्र झोपडपट्टी [सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन] अधिनियम १९७१, मधील ३[क][१] अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र झोपडपट्टी [सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन] अधिनियम १९७१, मधील ३[क][१] अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत उपरोक्त कार्यपध्दतीत सुसुत्रता आनणेकरीता सदर प्रकरणी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१. संस्था/जमिन मालक यांनी कलम ३[क][१] अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याच्या अनुषंगाने सादर करावयाचा प्रस्ताव हा दोन प्रतिंमध्ये प्राधिकरणाकडे सादर करावा त्यावर उपजिल्हाधिकारी कक्षाकडून कार्यवाही करावी. सोबत अर्जाचा नमुद जोडलेला आहे. सदर प्रस्तावासोबत खालील नमुद कागदपत्रे अर्जदाराने जोडणे आवश्यक आहे.

अ] ७/१२ उतारा व मालमत्ता पत्रकाची मुळ/प्रमाणित प्रत.

ब]संस्थेतील झोपडीधारकांची यादी व झोपडीस्थित नकाशा [संस्थेचे अध्यक्ष/मुख्य प्रवर्तक/सचिव यांचे स्वाक्षरीने ]

क] संस्थेने पारित केलेल्या सर्वसाधारण सभेच्या सर्वसाधारण ठरावाच्या इतीवृत्तांताची प्रत.

ड] जमिन मालकाचे संमतीपत्र/ संस्थेची जागा मुळ मालकाकडून विकासकाने विकत घेतली असल्यास त्याबाबतचे नोंदनिकृत दस्ताऐवज.

इ] नगर भुमापन नकाशा.

फ] विकास आराखडा अभिप्राय.[D. P. Remarks]

ग ] या व्यतीरिक्त प्राधिकरणाने प्रकरणी मागणी केलेली इतर कागदपत्र सोबत सादर करावीत.

२.वरील प्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा कक्षाने सदरच्या प्रस्तावाची आवश्यक अभिलेखाच्या दृष्टीने छाननी करुन प्रस्तावाची एक प्रत नगर भुमापन अधिकारी, झोपुप्रा यांना पाठवावी. नगर भुमापन अधिकारी यांनी त्यांचे विभागाकडील परिपत्रक -१, क्र. झोपुप्रा/नभु/कार्या-१/टेएस-१/४१, दि. १८/०६/२००९ मधील परिच्छेद क्र. ३ नुसार सदर जागेची स्थाननिश्चिती, क्षेत्रनिश्चिती व पंचनामा करुन अधिसुचनेच्या मसुदयासह झोपडीस्थित नकाशा प्रमाणित करुन मालकी हक्काच्या अभिप्रायासह सविस्तर अहवाल उपजिल्हाधिकारी कक्षास सादर करावा.

३.जमिन मालकाची संमती नसल्यास संबंधित जमिन मालकास नैसर्गिक न्यायतत्वानसार उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा यांचे स्तरावर सुनावणी देऊन अहवालासह प्रस्ताव मा. सचिव, झोपुप्रा यांना पुढील निर्णयाकरीता सादर करावा.

४.सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपजिल्हाधिकारी झोपुप्रा यांनी सदर क्षेत्राची स्थळ पहाणी करुन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याच्या अनुषंगाने अधिसुचनेच्या मसुदयासह प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सचिव, झोपुप्रा यांचेकडे सादर करावा.

५. सचिव, झोपुप्रा यांनी त्यांचे अभिप्रायासह मान्यतेसाठी प्रस्ताव मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचेकडे सादर करावा. प्रस्तावास मंजुरी देण्याच्या अनुषंगाने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांच्या सुचना असल्यास त्यानुसार सुनावणी घेणे अथवा अन्य कार्यवाही उपजिल्हाधिकारी कक्षामार्फत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांच्या मान्यतेने करावी.

६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी प्रकरणी मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर अधिसुचना राजपत्रात तसेच जनसंपर्क अधिकारी यांचेमार्फत वृत्तपत्रांत प्रसिध्द होणेची कार्यवाही उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा यांनी करावी.

७. प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर संचिका उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा कक्षाने जतन करावी व न्यायालयीन प्रकरणे निर्माण झाल्यास उपजिल्हाधिकारी कक्षाकडून पाठपुरावा करण्यात यावा.

८. अंतिमत: उपरोक्त कार्यपध्दती पुर्ण होताच संबंधित नस्ती ही उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा विभागाच्या अभिलेखकक्षात जतण करण्यात येईल.

९. प्रसिध्दी बाबतची देयके असल्यास उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा यांनी वित्त विभागाकडे वर्ग करावीत त्यानुसार वित्त विभागाने देयकाची रक्कम संबंधित विभागास अदा करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण